**आर.सी.सी. क्र.२८१/२०२२**

**नि.क्र. २३२**

(सदर साक्षीदार क्र.२२ नामे रुद्र नंदकिशोर प्रसाद दत्त हा जिल्हा व सत्र न्यायालय, सिवान (बिहार राज्य ) येथे व्ही.सी. द्वारे हजर असुन त्यांचा पुरावा व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात येत आहे. तेथील व्ही.सी. रुममध्ये सदर साक्षीदार व कॉर्डीनेटर हजर असुन सदर पुरावा हा गुगलमिट सॉफटवेअरद्वारे नोंदवण्यात येत आहे व सदर व्ही.सी. रुममध्ये साक्षीदार आणि कॉर्डीनेटर यांच्या व्यतिरीक्त कुणीही हजर नसल्याबाबत खात्री केली आहे. तसेच सदर व्हीडीओ व ऑडीओ क्वॉलीटी क्लीअर असुन कनेक्टीव्ही संदर्भात काहीही अडचण दिसुन येत नाही.)

**<u>शपथेवर उर्वरीत उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे नाही की बँक स्टाफच्या आयडीवरुन व्यवहार झाल्याचे स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये नमुद असल्याने सदर फ्रॉडसाठी बँक स्टाफ जबाबदार होता.

प्रश्न- दि.२६.३.२०२१ ते ३.४.२०२१ मध्ये झालेल्या स्पेशल ऑडीटमध्ये जर बँक स्टाफचे नाव असेल तर तुम्ही त्या स्टाफविरुध्द फिर्याद दाखल कराल का?

उत्तर- स्पेशल ऑडीटमध्ये बँक स्टाफ यांना आर्थिक लाभ मिळाल्याचे सिध्द झालेले नाही. त्यामुळे पुरवणी जबाबातही बँक स्टाफचे नाव नाही.

हे म्हणणे खरे नाही की स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये सर्व व्यवहार हे बँक स्टाफच्या आयडीवरुन झाले आहेत.

प्रश्न- स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये सर्व व्यवहार बँक स्टाफच्या आयडीवरुन झाले नसल्याचे तुम्ही सांगता तर अजुन कोणत्या आयडीवरुन ते व्यवहार झाले?

उत्तर- ते मला स्पेशल ऑडीट रिपोर्ट पाहुन सांगावे लागेल. मला जेवढे आठवते त्याप्रमाणे काही खातेदारांनी गौतम जाधवला कॅश जमा करण्यासाठी पैसे दिले असता ते त्यांच्या खात्यावर जमा झाले नाहीत.

प्रश्न- स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये असणा-या बँक स्टाफ आयडीबाबत तुम्ही सांगु शकता मात्र त्या रिपोर्टमध्ये आरोपीचा आयडी किंवा बी.सी.कोड आहे की नाही याबाबत तुम्ही सांगु शकत नाही?

उत्तर- आरोपीचा बी.सी.कोड त्या ऑडीट रिपोर्टमध्ये नमुद आहे की नाही हे मला

सांगता येणार नाही. मला तो रिपोर्ट निट बघावा लागेल.

दि.२३.१०.२०२० रोजी गौतम जाधव याने राजीनामा दिला होता की आमच्या बँकेने त्यास काढुन टाकले होते याबाबत मला सांगता येणार नाही कारण मी त्यावेळी नव्हतो. मी त्याचा राजीनामा पाहीला नव्हता. नागेंद्रकुमार पांडा यांनी दिलेली एफआयआर मी वाचली असेल. मात्र ती आता माझ्या लक्षात नाही.

प्रश्न– तुमच्याकडे आलेल्या खातेदारांच्या तक्रारी अर्जांमध्ये बँक कर्मचा–यांचे नाव असताना तुम्ही केवळ आरोपीविरुध्दच का फिर्याद दिली?

उत्तर– माझ्या सप्लीमेंटरी स्टेटमेंटसाठी ११ खातेदारांचे आलेल्या तक्रारी अर्जांमध्ये गौतम जाधवचे नाव होते व स्पेशल ऑडीट रिपोर्टमध्ये मनी ट्रेल हा आरोपीपर्यंत दिसत असल्याने मी आरोपीविरुध्द सप्लीमेंटरी स्टेटमेंट दिले.

प्रश्न– स्पेशल ऑडीट रिपोर्टमधील मजकुर व फाइंडींग ही बरोबर आहे?

उत्तर– तसे आपण म्हणु शकतो.

प्रश्न– बँकेने फ्रॉडबाबतची रक्कम सर्व खातेदारांना व्याजासहीत परत केली होती?

उत्तर– काही प्रकरणांमध्ये परत केली होती.

हे मला माहीत नाही की काही खातेदारांना फ्रॉडची रक्कम परत देणे बाकी आहे किंवा कसे.

प्रश्न– फ्रॉड बाबतची रक्क्म बँकेने खातेदारांना कशातुन परत केली होती?

उत्तर– बँकेच्या काही पॉलीसीज असतात. त्या पॉलीसी अंतर्गत बँकेने ती रक्कम खातेदारांना परत केली होती.

त्या पॉलीसीचे नाव मलासांगता येणार नाही.

प्रश्न– सेल्फ म्हणुन लिहीलेला चेक क्लीअर होण्यासाठी बँक काय माहीती घेते?

उत्तर– त्यासाठी रेग्युलेशन असते व ते एन.आय. ॲक्ट खाली नमुद आहेत. त्याबाबत मला आता निश्चित सांगता येणार नाही.

प्रश्न– सेल्फ म्हणुन लिहीलेला चेक जमा करताना खातेदार स्वतः हजर असणे गरजेचे आहे का?

उत्तर– एन.आय. ॲक्टमध्ये ब–याचशा गोष्टी नमुद आहेत. त्याबाबत मला आता सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की मी रिजनल मॅनेजर असुनही मला एन.आय. ॲक्टबाबत माहीती नाही. हे मला सांगता येणार नाही की सेल्फ म्हणुन लिहीलेला चेक जमा करताना खातेदार स्वतः हजर असणे गरजेचे आहे.

प्रश्न- सुखदेव पवार यांचा सेल्फ म्हणुन लिहीलेला चेक रक्कम रु.९,२२,०००/- चा ज्याच्यामागे आरोपीची सही आहे त्या आरोपीला एवढी मोठी रक्कम सुखदेव पवार हजर नसताना देता येवु शकते का?

उत्तर- बेअरर चेक असेल तर देता येवु शकते.

प्रश्न- खातेदाराच्या रक्कम रु.९,२२,०००/- च्या विथड्रॉवल स्लीपच्या मागे जर आरोपीचे नाव लिहीले असेल तर त्या खातेदाराच्या अनुपस्थित ती रक्कम आरोपीस देता येवु शकते का?

उत्तर- नाही देता येवु शकत.

हे म्हणणे खरे आहे की बँक स्टाफने दुस-या बँक स्टाफला त्याचा आयडी देणे नियमाच्या विरुध्द आहे. हे मला सांगता येणार नाही की सदरचा फ्रॉड हा वडझीरे शाखेत झाला आहे का आरोपीच्या सी.एस.सी. सेंटरमध्ये झाला आहे. हे मला सांगता येणार नाही की सुखदेव पवार यांची फ्रॉडबाबतची रक्कम आरोपीला त्याच्या अकाउंटमध्ये मिळाली का कॅश काउंटरवर मिळाली. हे मला सांगतायेणार नाही की खातेदारांच्या खात्यांमधील रक्कम ही विथड्रॉ झाल्याबाबत किंवा कॅश काउंटरवर मिळाल्याबाबत आरोपी कॅश काउंटरमध्ये त्यासाठी जावु शकत नाही.

मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब.

रिमोट पॉइंट कॉर्डीनेटर

Radhe Shyam Kumar

राधेशाम कुमार
सिस्टम ऑफीसर,
सिवान कोर्ट, राज्य बिहार.

साक्षीदार

रुद्र नंदकिशोर प्रसाद दत्त
साक्षीदार

संबंधीत न्यायदंडाधीकारी
यांची सही

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2026.03.02 16:49:39 +0530

(डॉ.एन.एस.सबनीस)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट नं.२, पारनेर.
दि. ०२/०३/२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.03.02 15:32:07 +0530

दिनांकः ०२/०३/२०२६. (डॉ.एन.एस.सबनीस)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

**<u>उर्वरीत उलटतपास मध्यान्हानंतर शपथेवर आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

प्रश्न– जेव्हा आरोपीने राजीनामा दिला व खातेदाराने तक्रारी अर्ज दिल्यानंतर बँक आरोपीला खातेदारांचे कॅशबाबत व्यवहार करु देईल का?

उत्तर– जेव्हा बी.सी.ला बँकेच्या पॅनेलच्या बाहेर काढतात तेव्हा त्याचा कोड सस्पेंड होतो व त्याला सिस्टमच्या बाहेर काम करु देवु शकत नाही.

प्रश्न– बँकेने आरोपीला एवढी मोठी रक्कम देणे म्हणजे यात बँक स्टाफव आरोपी या दोघांचा समावेश असु शकतो किंवा आरोपीच्या नावाचा गैरवापर होवु शकतो?

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की बँक स्टाफ आयडीशिवाय कोणतीही रक्कम जमा होवु शकत नाही किंवा काढली जावु शकत नाही.

प्रश्न– वडझीरे शाखेत फ्रॉड झाल्यावर तुम्ही किती बँक कर्मचा–यांविरुध्द कार्यवाही केली?

उत्तर– पुढील तपासासाठी मी त्या तपासाचा भाग नसल्याने मला हे सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की सुखदेव पवार यांची रक्कम रु.९,२२,०००/– संदर्भातील फ्रॉडबाबत त्यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात आरोपीचे नाव नसताना व बँक कर्मचा–याचे नाव असताना त्या कर्मचा–यांना वाचवण्यासाठी मी आरोपीविरुध्द खोटा रिपोर्ट दिला व खोटे सप्लीमेंटरी स्टेटमेंट दिले. हे म्हणणे खरे नाही की सुखदेव पवारच्या रकमेबाबत फ्रॉड बँक स्टाफने मिळुन केला व केवळ त्यामध्ये आरोपीचे खोटे नाव गुंतवले.

प्रश्न– गौतम जाधवने राजीनामा दिल्यानंतर त्यानंतर झालेल्या फ्रॉडबाबत बँक स्टाफ जबाबदार असणार?

उत्तर– हे मी सांगु शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की २/३ वर्षापासुन झालेल्या फ्रॉडमध्ये आरोपी हा बँक स्टाफच्या समावेशा शिवाय तो एकटा फ्रॉड करु शकत नाही. हे मला सांगता येणार नाही की बेअरर चेकवर सेल्फ लिहीले असेल तर खातेदार प्रत्यक्ष बँकेत हजर असणे गरजेचे आहे किंवा कसे. मी सांगतो की त्यासाठी एन.आय. ॲक्टमध्ये तरतुदी आहेत. हे मला सांगता येणार नाही की एखादा अशिक्षीत व्यक्तीस जर पैसे विथड्रॉ करायचे असतील तर त्यासाठी बँक काय खबरदारी घेते. मी सांगतो की त्यासाठी बँकेचे नियम व रेग्युलेशन्स असतील. हे माझ्या लक्षात नाही की वडझीरे शाखेतील ज्या सर्व खातेदारांसंदर्भात फ्रॉड झाला ते सर्व खातेदार अशिक्षीत नव्हते किंवा कसे.

प्रश्न– जर अशिक्षीत खातेदारास पैसे काढण्याबाबत मदत हवी असेल तर बँक स्टाफ बँक करस्पॉडंटला त्याबाबत मदत करण्यास सांगु शकतो का?

उत्तर– ते खातेदारावर निर्भर असेल.

प्रश्न– बँकेमध्ये दरदिवशी झालेले व्यवहार हे दिवसाच्या शेवटी तपासण्याची जबाबदारी ब्रँच मॅनेजरची असते?

उत्तर– ते प्रत्येकाच्या रोलवर अवलंबुन राहील.

जर ग्राहक बॅकेत उपस्थित नसेल तर मॅनेजर व्हाउचर पास करु शकतो का हे प्रत्येक परिस्थितीवर अवलंबुन असेल.

प्रश्न– आरोपीच्या राजीनाम्यानंतर देखील तुमच्या ऑफीसकडे खातेदारांच्या तक्रारी आल्या होत्या?

उत्तर– राजीनाम्याची तारीख मला माहीत नाही मात्र तक्रारी अर्ज सन २०२०–२१ या कालावधीमध्ये आल्या होत्या.

हे म्हणणे खरे आहे की किसान क्रेडीट कार्डचे लोन बी.सी. करु शकत नाही. आरोपीची एजन्सी व बँकेमधील करार अजुनही बँकेत आहे का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की वडझीरे शाखेतील फ्रॉड हा बँक कर्मचा–यांनी मिळुन केला असुन केवळ गौतम जाधवचे नाव यामध्ये खोटे गुंतवले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

| रिमोट पॉइंट कॉर्डीनेटर | साक्षीदार | संबंधीत न्यायदंडाधीकारी यांची सही |
|---|---|---|
| Radhe Shyam Kumar | | NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.03.02 16:49:51 +0530 |
| राधेशाम कुमार | | (डॉ.एन.एस.सबनीस) |
| सिस्टम ऑफीसर, | रुद्र नंदकिशोर प्रसाद दत्त | न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, |
| सिवान कोर्ट, राज्य बिहार. | साक्षीदार | कोर्ट नं.२, पारनेर. |
| | | दि. ०२/०३/२०२६ |

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.03.02 15:32:16 +0530

दिनांकः ०२/०३/२०२६.

(डॉ.एन.एस.सबनीस)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA

AADHAAR



Rudra Datt

1981-01-27

Male

xxxxxxxx2589

Submitted to Civil Court, Siwan
02/Mar/26.

Address:

301, Decent Apartments, SPBTC Quarters, Sant Gyaneshwar Road, Adani Power, JVPD, Mumbai, Vileparle (West), Mumbai Suburban, Maharashtra, 400056

Powered by DigiLocker

Tap to Zoom

मेरा आधार, मेरी पहचान